आंदोलनाबाबत                                   दिनांक -   /     /२०१८

पत्र सादर –

प्रतिश्री...........................................................................................................................

यांचेकडे प्रस्तूत,शासन प्रलंबित संघर्षमय विषय....

# विश्वसंत जगद्गुरू तुकोबारायांची साक्षात्कार तपोभूमी श्रीक्षेत्र भामचंद्र भंडारा डोंगर बचाव अभियान !

महोदय,

**महाराष्ट्रात 'डाऊ' कंपनी विरोधात वारकऱ्यांचे झालेले आंदोलन हे पवित्र संतभूमी व पर्यावरणाचे जतन संरक्षणार्थ झाले होते.** असे असताना आज विकासाच्या नावे श्रीश्रेत्र भंडारा डोंगराचा पावन महिमा व पर्यावरण येथील बिल्डर व्यावसायिकांमुळे आणि इथे येणाऱ्या उथळ पर्यटकांपासुन बाधित होत असून, एकेकाळचे भाविक वारकऱ्यांचे तीर्थाटण व अध्यात्मिक साधकांचे ध्यान-चिंतन, पवित्र एकांतिक साधनाकेंद्र (शान्तिक्षेत्र) हे आज हरवत चालले आहे. येथील प्राचीन वास्तू आणि एकांत स्थायीभाव संपवण्याला शासनाबरोबर स्थायी समिती कारणीभूत आहे.

याहून विध्वंस म्हणजे,संतश्रेष्ठ तुकोबारायांची साक्षात्कार तपोभूमी म्हणून प्रसिध्द असलेला भामचंद्र डोगराचा पायथा व टेकड्या एम.आय.डी.सी व खाजगी व्यावसायिकांकडून तोडल्या जात असून सर्व बाजूने डोंगराचे अखंडत्व,स्वाभाविक सौन्दर्य व पावित्र्य खंडित होत आहे.

**जगद्गुरूंच्या या ऐतिहासिक प्राचीन लेणीसंपन्न सांस्कृतिक साधनाभूमीचे अखंडत्व पावनत्व नैसर्गिकपणे जतन संरक्षण व्हावे म्हणून संतभूमी संरक्षक संघर्ष 'समिती' गेली कित्येक वर्षेप्राणपणाने शासनाविरोधात लढा देत आहे**,परंतु अजूनही शासनाने गंभीरपणे याची दखल घेतलेली नसून याबाबत जाणून-बुजून डोळेझाकपणा व दुर्लक्ष केले आहे.

**पूर्वीच्या सरकारने या तपोभूमी डोंगरांचे अखंड संरक्षणार्थ योग्य अशा'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून प्रारूप अधिसूचना सन २०११ ला घोषित केल्या परंतु** त्यावर आलेल्या हरकतींची योग्यायोग्य शहानिशा न करता व सुनावणी न घेताच येथील स्थानिक पुढाऱ्यांच्या पत्रानुसार अंतिम अधिसूचनेसाठी चुकीचा प्रस्ताव तयार करून त्यातून एम.आय.डी.सी व खाजगी व्यावसायिकांना डोंगर-टेकड्या फोडण्यास वाव व मोकळीक दिली.त्याला वारकरी संप्रदायातील संतमहंतानी पत्रप्रस्तावाद्वारे विरोध केला,परंतु अधिसूचनेवरील निर्णय प्रलंबित ठेऊन विद्यमान सरकारनेही वारकरी संप्रदायाबाबत असंवेदनशीलता दाखवून तीच परंपरा कायम चालवली आहे

मूळ अधिसूचनेत दोन्ही डोंगर संपूर्णपणे पायथ्यापर्यन्त पूर्ण संरक्षित केले होते परंतु त्यातील संरक्षित केलेले क्षेत्र निम्म्याहून कमी करून त्रोटक (फक्त लेणीसभोवतालचे) क्षेत्रच प्रस्तावित नविन प्राथमिक व अंतीम

अधिसूचनेसाठी ठेवले आहे.शासनच्या या फसवणुकीमुळे तपोभूमी डोंगर व पायथा आज अवैधपणे खंडित होत असून याला बेजबाबदार शासनच जबाबदार आहे.**भंडारा-भामचंद्र डोंगर हा सह्याद्रीचा अविभाज्य भाग असूनहि 'इको सेन्सेटिव्ह झोन' मधुन हे क्षेत्र वगळून या " वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे " संपन्न तपोभूमीवर शासनाने अन्याय केला आहे.**

**वास्तविक हे दोन्ही डोंगर १) सांस्कृतिक २) पुरातत्त्व ३) वन ४) जैवविविधता ५) पर्यावरण ६) प्रदूषण ७) नगररचना ८) महसूल इ. शासनाच्या अनेक विभागाशी संबधित असताना संघर्ष समितीने या विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही, छत्रपती शिवरायांच्या सद्गुरूंचे हे ऐतिहासिक संतपीठ डोंगर वारसा स्थळ अखंडपणे जतन संवर्धन करण्याच्या कर्तव्याची या विभागानी सोयीस्करपणे चाल-ढकल,टाळा-टाळ,केले असून त्यासंबंधीत कायद्याची पायमल्लीहि केली आहे. हे केवळ धनिक, उद्योग व्यावसायिकांचे हितसंबंध जपण्यासाठी होत आहे.हे स्पष्ट आहे**.

शासनाच्या विविध विभागामध्ये परस्परपूरक समन्वयाची कोणतीही विधायक भूमिका दिसत नसून खरे पाहता या तपोभूमिसाठी सन २०११ च्या घोषित अधिसूचना वरील सर्व विभागांसाठी अनुकूल असतानाही एकत्रितपणे याचा आस्थापूर्वक कधीही विचार केलेला नाही हि प्रशासनाची फार मोठी त्रुटी आहे. **सांस्कृतिक मंत्री यांनी आता नुकतेच सांस्कृतिकविभागाचे उपसचिव, प्रधान सचिवांमार्फत केवळ पुरातत्व विभागासी संबंधित तज्ञांची मर्यादित समिती गठीत करण्यासाठी पुरातत्व विभागाचे संचालकांना सूचना केली. परंतु या तपोभूमी डोंगर संबंधित हा एकांगी व तोकडा विचार आहे.**

**यावरुन, सन २०११ च्या मूळ न्याय प्रारूप अधिसूचनेतून वगळलेले डोंगरातील संरक्षित क्षेत्र हे येथील बिल्डर व उद्योग व्यावसायिकांच्या घश्यात घालून जाणीवपूर्वक हा संतपीठाचा श्री तुकोबांचा डोंगर वारसा कायमचा मिटवून टाकण्याचा सरकारने जणू चंग बांधल्याचे दिसते** व यासाठी पुन्हा आंदोलन होऊ नये म्हणून गत व चालू सरकारने आश्वासन देऊनही वारकरी आंदोलकांवरील 'डाऊ' चे खटले मागे घेतलेले नाहीत त्यामुळे तपोभूमी रक्षणाचा गंभीर मुद्दा हा न्यायासाठी लढणाऱ्या अनेक संघटना व विरोधी पक्षांकडे सुपूर्द करण्याची वेळ आता संघर्ष समितीवर आलेली आहे.

आपला तुकयाभक्त

संस्थापक – अध्यक्ष
संतभूमी संरक्षक संघर्ष 'समिती' महाराष्ट्र राज्य

*मार्गदर्शन व संपर्कासाठी

ई मेल – **maharajmadhusudan178@gmail.com**

वेबसाईट **-www.santbhumi.com**

संपर्क - ७०८३७०५१७८, ९७६५३८७०४०,
९४२१०१२०७१,९३७०२४५४८७